# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:19.04.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या,**

- **महिला आरक्षणासंदर्भातील विधेयक मंजूर न झाल्याबद्दल पंतप्रधानांकडून खेद व्यक्त; या विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांवर जोरदार टीका**
- **केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेला ३ वर्ष मुदतवाढ**
- **गृह विभागातील विविध प्रकरणांचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा**
- **आणि**
- **येत्या २ दिवसात कोकण, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाची शक्यता**

आता सविस्तर बातम्या

**पीएम संबोधन**

देश हित आपल्या सरकारसाठी सर्वात महत्वाचं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. महिला आरक्षणासंबंधीचं विधेयक संसदेत मंजूर होऊ शकलं नाही; त्यानंतर काल पंतप्रधानांनी देशवासीयांना संबोधित केलं. सरकारनं अत्यंत कळकळीनं आणि प्रामाणिकपणे प्रयत्न करूनही नारी शक्ती वंदन अधिनियमात दुरुस्तीचा मार्ग मोकळा करू शकलो नाही याबद्दल त्यांनी देशातील माता भगिनींची माफीही मागितली.

**बाईट – मोदी १ – क्षमा**

जेव्हा काही लोकांसाठी केवळ त्यांचा पक्षच अन्य कशाहीपेक्षा महत्त्वाचा होतो तेव्हा महिला सक्षमीकरण आणि राष्ट्र हिताला त्याचे परिणाम भोगावे लागतात, अशा शब्दात पंतप्रधानांनी काँग्रेससह इतर विरोधी पक्षांवर टीका केली. ते म्हणाले, महिलांच्या हिताचं विधेयक मंजूर होऊ शकलं नाही तेव्हा आपण अतिशय व्यथित झालो असताना महिलांचे हक्क हिरावून घेऊन, काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पार्टी, आणि तृणमूल काँग्रेसचे सदस्य टाळ्या आणि बाकं वाजवत होते. त्यांचं हे कृत्य महिलांची प्रतिष्ठा आणि स्वाभिमानाला सुरुंग लावणारं आहे, असंही ते म्हणाले. नारीशक्ती वंदन विधेयकात सुधारणा होणं ही काळाची गरज असून उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम अशा सर्व भागात सक्षमीकरणाचा समतोल साधण्याचा तो प्रयत्न होता, असंही पंतप्रधानांनी नमूद केलं. राज्य मोठे असो वा लहान—प्रत्येक राज्याचं संसदेतलं स्थान, त्यांचं प्रतिनिधित्व योग्य प्रमाणात वाढवून अधिक बळकट करणं हा या विधेयकाचा उद्देश होता; परंतु काँग्रेस आणि त्याच्या मित्रपक्षांनी हा प्रामाणिक प्रयत्न हाणून पाडला, असं पंतप्रधान म्हणाले ---

**बाईट – मोदी २ – स्टेट**

ज्या पक्षांनी नारी शक्ती वंदन सुधारणेला विरोध केला ते महिलांच्या शक्तीला गृहीत धरत आहेत. महिला आरक्षणाला विरोध करण्याच्या पापाची नक्कीच त्यांना शिक्षा मिळेल, असंही मोदी म्हणाले. दरम्यान संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज काल अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं.

**<u>महागाईभत्ता</u>**

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता २ टक्के वाढवून ६० टक्के करण्याचा निर्णय केंद्रानं घेतला आहे.१ जानेवारी २०२६ पासून ही वाढ लागू होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असं, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. साडे ५० लाख कर्मचारी आणि ६८ लाखांहून अधिक निवृत्तीवेतन धारकांना याचा लाभ होणार आहे. यामुळं सरकारी तिजोरीवर वर्षाला सुमारे ६ हजार ७९१ कोटी रुपयांचा भार पडणार आहे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना-३ ला मार्च २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्यासही काल केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. तसंच १२ हजार ९८० कोटी रुपयांचा 'भारत सागरी विमा पूल' स्थापन करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. जागतिक अनिश्चिततेच्या काळातही भारतीय जहाजांना आणि सागरी व्यापाराला अखंडित विमा संरक्षण उपलब्ध करून देणं हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

**हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे....**

**<u>अक्षय तृतीया-33धुळे4-22नवीमुंबई</u>**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेचा सण आज सर्वत्र उत्साहात साजरा केला जात आहे. या दिवशी नवीन कामांचा शुभारंभ केला जातो. सोने खरेदी, गृह खरेदी, वाहन खरेदीकडेही नागरिकांचा कल असतो. या निमित्तानं राज्यभरातल्या बाजारांमध्ये खरेदीचा उत्साह दिसून येत आहे. खान्देशात घराघरात आज आखाजीचा सण साजरा होतो. जळगाव, धुळे शहरातील बाजारपेठा आंबे, डांगर आणि मातीच्या घागरी यांनी सजली आहे.

अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील फळ मार्केटमध्ये आंब्याची मोठ्या प्रमाणात आवक झाली आहे.

दरम्यान अक्षय्य तृतीयेच्या या शुभमुहूर्तावर राज्यात मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळेही होतात. याच दिवशी बालविवाह रोखण्यासाठी राज्य प्रशासनाने कडक पावलं उचलली आहेत. महिला आणि बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर यांनी काल या संदर्भात राज्यातल्या विविध यंत्रणांची दूरस्थ माध्यमातून बैठक घेतली. ग्रामीण पातळीपासून जिल्हास्तरापर्यंत विविध यंत्रणांनी बालविवाह रोखण्यासाठी सतर्क राहण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

**<u>मुख्यमंत्री</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत अनेक महत्वाच्या विषयांवर बैठका घेतल्या. गृह विभागाच्या बैठकीत त्यांनी महत्त्वाच्या प्रकरणांचा आढावा घेतला. त्यामध्ये नाशिकच्या टीसीएस कंपनीतील गैरप्रकार, भोंदूबाबा अशोक खरात, अमरावतीमधील अल्पवयीन आणि महिलांचं लैंगिक शोषण तसंच मुंबईतील गोरेगाव येथील एका संगीत कार्यक्रमातील अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे झालेला मृत्यू या प्रकरणांचा समावेश होता. या सर्व प्रकरणांचा सखोल तपास करून कठोर कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी पोलिसांना दिल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मध्य आशियातील डेटा सेंटर क्षेत्रातील अनेक नामांकित कंपन्या महाराष्ट्रात गुंतवणूकीसाठी उत्सुक आहेत. या पार्श्वभूमीवर, करार झाल्यानंतर संबंधित कंपन्यांना त्वरित जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश फडणवीस यांनी अन्य एका बैठकीत दिले.

**नाशिकप्रकरण-५४नाशिक४**
राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोगाच्या चार सदस्यीय तथ्यशोध समितीनं  टीसीएस कंपनीमधील कथित धर्मांतराचा प्रयत्न आणि लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या चौकशीसाठी काल नाशिकमध्ये तपासाला सुरुवात केली.

**परतवाडा**
अमरावतीच्या परतवाडा येथील अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी उच्चस्तरीय बैठक घेतली. तपासाचा अहवाल दर ५ दिवसांनी सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. या प्रकरणात आतापर्यंत एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक करत आहे.

**एटीएस-फडणवीस**
एटीएस अर्थात ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन प्रणालीबंद असल्यामुळे रखडलेल्या वाहन परवाना नूतनीकरण प्रक्रियेला केंद्रीय मंत्री नितीनगडकरी यांनी यावर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे राज्यातल्या टेम्पो,शाळेच्याबसेस, रिक्षा यांचा परवाना नूतनीकरण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एटीएसप्रणाली अद्ययावत करण्यासाठी बंद करण्यात आली होती, त्यामुळे परवानानूतनीकरणाची प्रक्रिया ठप्प झाल्यानं, १५ लाख वाहतूक व्यावसायिकांची गैरसोयहोत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात पत्र लिहून विनंती केलीहोती.

**जनजागृतीफेरी**
‘माझं गाव, आरोग्यसंपन्नगाव’ या आरोग्य विभागाच्या महत्त्वाकांक्षी अभियानाचा प्रभावीपणे प्रसारकरण्यासाठी रत्नागिरी तालुका आरोग्य विभागातर्फे काल शहरात जनजागृती फेरी काढण्यातआली. त्यात फलक, घोषवाक्यं आणि संदेशांद्वारे नागरिकांचं लक्षवेधण्यात आलं. तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर महेश्वरी सातव यांनी प्रतिबंधात्मकउपाययोजनांना प्राधान्य देण्याचं महत्त्व अधोरेखित केलं.

**भोंदूबाबा-22अहिल्यानगर4**
अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील वडगाव पान इथल्या भोंदू बाबा राजेंद्र बापू गडगे यांच्यासह चार जणांवर संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी भोंदू बाबा सह एकाला अटक करण्यात आली आहे. आपल्या दैवी शक्तीने कर्करोगासारखे दुर्धर आजार बरे करतो, असा दावा करणारे या बाबांचे व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाले आहेत.

**गोदासंवाद-५५नाशिक४**
जागतिक वारसा दिनानिमित्त नाशिकमध्ये ‘इरा सेंटर फॉर इंडिक स्टडीज’च्या वतीने काल सकाळी ‘गोदा संवाद’ ही वारसा फेरी आयोजित केली होती. नाशिकचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जाणून घेण्यासाठी

नागरिकांनी यामध्ये सहभाग घेत गोदाघाटावरील विविध प्राचीन मंदिरे, वास्तू, वाडे यांना भेटी दिल्या. नाशिकच्या ऐतिहासिक स्थळांची माहिती देणाऱ्या 'गाईड बुक'चं यावेळी प्रकाशन करण्यात आलं.

**काकतकर निधन**

दूरदर्शनचा सुवर्णकाळ गाजवणारे ज्येष्ठ निर्माते, दिग्दर्शक आणि कवी अरुण काकतकर यांचं अल्प आजारानं काल दुपारी पुण्यात निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. दूरदर्शनवरील 'शब्दांच्या पलिकडले' सारख्या अनेक दर्जेदार कार्यक्रमांची निर्मिती आणि दिग्दर्शन त्यांनी केलं. दूरदर्शनच्या पडघवली सारख्या अनेक चित्रपटांची निर्मिती आणि अनेक जाहिरातपटांचे दिग्दर्शनही त्यांनी केलं होतं. पुण्यातील बालचित्रवाणीचे उपसंचालक म्हणून त्यांनी अनेक शैक्षणिक कार्यक्रमांची निर्मिती केली.

**हवामान**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे. तर विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडेल तर काही ठिकाणी हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या,**

- **महिला आरक्षणासंदर्भातील विधेयक मंजूर न झाल्याबद्दल पंतप्रधानांकडून खेद व्यक्त; या विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांवर केली जोरदार टीका**
- **केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ, प्रधानमंत्री ग्रामसड़क योजनेला ३ वर्ष मुदतवाढ**
- **गृह विभागातील विविध प्रकरणांचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा**
- **आणि**
- **येत्या २ दिवसात कोकण, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाची शक्यता**

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.